Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 439 – 444

DOI: 10.5281/zenodo.10131578

Original Research Article

# महात्मा गांधी : असहकार चळवळ

चंदा गणेश चव्हाण

इतिहास विभाग, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर ४१३५१७ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: chavanchanda560@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या व राष्ट्रीय काँग्रेसच्या इतिहासात 1920 ते 1948 या कालखंडाला 'गांधीयुग' असे म्हणतात. या काळात राष्ट्रीय आंदोलनाची संपूर्ण सुत्रे म.गांधीकडे होती. याचा अर्थ यावेळी प्रभावी व लोकप्रिय असे इतर नेते नव्हते असे नाही. पण संपूर्ण देशात व काँग्रेस गांधीकडे पूर्णपणे आकृष्ट झाली होती. गांधीजींकडे अशी काही चुंबकीय शक्ती होती की, सर्वच भारतीय त्यांच्याकडे खेचले गेले होते. गांधीजींचा शब्द म्हणजे काँग्रेसचा शब्द अशी परिस्थिती निर्माण झाली होती. टिळकांचा 1920 मध्ये मृत्यू झाला होता. सरकारने केलेल्या दडपशाहीमुळे जहालवादी चळवळीचे खच्चीकरण झाले होते. अशा बिकट परिस्थितीत भारतीय लोकांच्या आशा-आकांक्षा व इच्छांना वळण लावणारा कणखर नेता आवश्यक होता आणि ही गरज म.गांधींनी भरून काढली.

भारतात असहकार आंदोलन सुरू करून गांधीजींनी देशाच्या स्वातंत्र्य आंदोलनातील नव्या युगाची सुरुवात केली. 1 ऑगस्ट 1920 रोजी असहकार आंदोलन सुरू करण्याचे ठरले. पण याच दिवशी टिळकांचाही मृत्यू झाला. त्यामुळे हा दिवस विचित्र योगायोगाचा होता. टिळकांचा मृत्यू व गांधीयुगाची सुरुवात हे गणितच नियतीने मांडून ठेवले होते की काय असे वाटल्याशिवाय राहत नाही.

## महात्मा गांधींचा उदय

गांधीजींचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी होते. त्यांचा जन्म 2 ऑक्टोबर 1869 रोजी पोरंबदर, काठियावाड, गुजरात येथे झाला. त्यांच्या पत्नीचे नाव कस्तुरबा होते तर मुलांची नावे हरीलाल, मणिलाल, रामदास आणि देवदास

गांधी अशी होती. प्राथमिक शिक्षण त्यांनी राजकोट गुजरात मॅट्रिक 1887 बॉम्बे युनिव्हर्सिटी, बॅरिस्टर -इंग्लंड येथे 1888 कायद्याची पदवी मिळण्यासाठी गेले. तेथून ते मायदेशी परतले. दरम्यान त्यांच्या आईचा मृत्यू झाला.

वकिली व्यवसायानिमित्त एका खटल्यासंदर्भात 1893 मध्ये ते दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटिश वसाहत नाताळ येथे गेले असता येथेच त्यांचा प्रभावी नेता म्हणून उदय झाला. द.आफ्रिकेच्या वास्तव्यात वर्णभेदाचा भयंकर अनुभव त्यांना मिळाला. निग्रो लोकांप्रमाणेच येथे स्थायिक झालेल्या भारतीयांची स्थितीही वाईट होती. ब्रिटिश राजवटीने हिंदी लोकांचा मतदानाचा हक्क हिरावून घेण्याचा कायदा केला. तसेच चोर-दरोडेखोराप्रमाणे हिंदी लोकांचे बोटाचे ठसे सरकारजमा करण्याचे आदेश दिले गेले. त्यामुळे गांधीजींनी याविरुद्ध व इतर अन्यायी कायद्याविरुद्ध सत्याग्रहाचा अहिंसात्मक लढा सुरू केला. 1906 ते 1914 या काळात आफ्रिकेतील सरकारला नमवून अनेक कर कायदे रद्द करून घेतले. त्यांच्या सत्याग्रहाला हा पहिला मोठा विजय मिळाला होता.

गोपाळ कृष्ण गोखले यांच्या आग्रहाने 1915 मध्ये ते मायदेशी परतले. गोखलेंना राजकीय गुरु मानून त्यांनी राजकारणात प्रवेश केला. भारतात आलेल्या गांधीजींचे भव्य स्वागत झाले होते. याच वेळी पहिले महायुद्ध सुरू होते. गांधीजींनी या युद्धात ब्रिटिश सरकारला मदत करण्याचे जाहीर केले. त्यामुळे सरकारने त्यांना 'कैसर-इ-हिंद' हा किताब बहाल केला. गांधीजींनी राजकारणात सक्रिय होण्याआधी संपूर्ण देशाचा 1 वर्ष दौरा केला. या दौऱ्यानंतर खरा भारत हा शहरात नसून खेडोपाडी आढळतो अशी त्यांची धारणा बनली. यानंतर अहमदाबादला साबरमती नदीजवळच्या परिसरात त्यांनी आपला आश्रम स्थापन केला. देशातील बहुसंख्य अशिक्षित व मागासलेल्या जनतेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांनी आपला वेष व जीवनपद्धती बदलून टाकली.

**गांधीजींचे हिंदुस्थानातील प्रारंभिक सत्याग्रह**

१. 1916 मध्ये गांधीजींनी देशात सत्याग्रहाचा पहिला प्रयोग केला. गांधीनी सरकारला सत्याग्रहाची धमकी दिली. त्यामुळे गुलामगिरीची पद्धत एप्रिल 1917 मध्ये सरकारने बंद केली.
२. बिहारमधील चंपारण्यातही युरोपियनांच्या निळीच्या मळयात हिंदी मजूर हलाखीचे जीवन जगत होते. गांधीजींनी स्वत: जाऊन हिंदू मजुरांची स्थिती पाहिली. गांधीच्या चंपारण्यात प्रवेशाला तेथील मॅजीस्टेटने बंदी घातली तरीही गांधीनी चंपारण्यात प्रवेश केला. ब्रिटिशांनी त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी हिंदी मजुरांचे प्रश्न सोडविण्यासाठी एक कमीशन नेमले व त्यात: गांधीची नियुक्ती केली. या कमिशनने 1918 मध्ये कायदा करुन चंपारण्यातील शेतकऱ्यांच्या तक्रारी दूर केल्या.
३. म. गांधीनी अहमदाबादेतील कापड गिरणी कामगारांना सत्यागृह करुन गिरणी मालकांकडून न्याय मिळवून दिला.
४. गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मदती साठी गेले. तेथे ही ब्रिटिश सरकारला त्यांच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या.

गांधीजीच्या एका पाठोपाठ एक अशा मिळत गेलेल्या विजयामुळे संपूर्ण हिंदूस्थानात गांधीजी लोकप्रिय बनले.

**असहकार चळवळ**

पहिल्या महायुध्दानंतर भारताला स्वयंनिर्णयांचे तत्व लागू केले जाईल अशी घोषणा अमेरिकन राष्ट्राध्यक्ष वुल्ड्रो विल्सनने केली होती. परंतु युध्दसमाप्तीनंतरही भारतीयांना इंग्रज सरकारकडून काहीही न मिळाल्याने भारतीयांचा मोठा अपेक्षाभंग झाला. इंग्रज सरकार दिवसेदिंवस क्रूर बनत चालेले होते. कोणत्याही परिस्थितीत इंग्रज भारतावरील ताबा सोडण्यास तयार नव्हते.

**रौलेट कायदा**

भारतातील क्रांतिकारी कारवायांवर आळा घालण्यासाठी व त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी सिडने रौलेट या न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली 1917 मध्ये सरकारने एक समिती स्थापन केली. एप्रिल 1918 मध्ये या समितीने आपला अहवाल ब्रिटीश सरकारला सादर केला. ब्रिटिशांनी संशयीत व्यक्तीला कारण न सांगता किंवा विनावॉरंट अटक करण्याचा व त्यांच्यावर खटला न भरता कितीही दिवस कारागृहात ठेवण्याचा अधिकार सरकारला असावा अशा तरतुदी होत्या.

भारतीय नेत्यानी या विधेयकाला कसून विरोध केला कारण त्यांच्या मते क्रांतीकारी कारवाया थांबवल्या असल्याने या तरतुदींची गरज नाही पण सरकारने कोणाचीही पर्वा न करता 18 मार्च 1919 रोजी "अनार्किकल ॲन्ड रेव्होल्युशनरी क्राइम्स ॲक्ट" हा कायदा पास केला. यालाच ‘रौलेट ॲक्ट’ असे म्हणतात. भारतीय या कायद्याला काळा कायदा म्हणत. 30 मार्च 1919 हा दिवस सत्याग्रहाचा दिवस म्हणून ओळखला जातो. या दिवशी सर्वजण उपस्थित नसल्यामुळे 6 एप्रिलला सत्याग्रह पाळण्यास सांगितला. दिल्ली मध्ये स्वामी श्रध्दाचंद व हकीक अजमलखान यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी रेल्वे, पोस्ट, तार यंत्रणा, सरकारी कचेऱ्या यांची नासधूस केली. सरकारने अनेक मिरवणूकांवर गोळीबार केले. दिल्ली व अमृतसरकडे गांधीजी निघाले असता 7 एप्रिल 1919 रोजी त्यांना अटक झाली. संपूर्ण देशात संतापाची लाट पसरली. अहमदाबादेत हिंसक आंदोलने केली. या वेळी झालेल्या गोळीबारात 300 लोक ठार झाले. संपूर्ण देशात हिंसाचार सुरू झाल्याने गांधीजींनी सत्याग्रह मोहीम स्थगित करून 3 दिवस उपोषण केले व सत्याग्रहासाठी स्वयंसेवक दल उभारण्याचा निर्णय घेतला.

**जालीयनवाला बाग हत्याकांड**

6 एप्रिल रोजी पंजाबमध्ये सत्याग्रह व हरताळ शांततेत पार पाडले होते. 9 एप्रिलला लेप्टनंट गव्हर्नर ओडवायरने पंजाबमधील लोकप्रिय नेते. डॉ.सेफूद्दीन व डॉ.सत्यपाल यांना स्थानबध्द केल्याने लोक अधिकच खवळले. 11 एप्रिल रोजी अमृतसर शहराचा ताबा जनरल डायरच्या हाती सोपविला गेला. 13 एप्रिल 1919 रोजी अमृतसरमधील जालीयनवाला बाग येथे सभा आयोजित केली. 26 मे 1920 रोजी या कमीशनचा पक्षपाती अहवाल प्रसिध्द झाला. या सर्व गोष्टीमुळे गांधीजीचे मन व्यथीत झाले व त्यांनी असहकार चळवळीचा निर्णय घेतला.

**खिलाफत चळवळ**

तुर्कस्थानचा खलीफा हा जगातील सर्व मुस्लिमांचा प्रमुख धर्मगुरु मानला जाई पहिल्या महायुध्दात खलिफाने इंग्लडविरुध्द जर्मनीच्या बाजूने युध्दात उडी घेतली. 24 नोंव्हेबर 1919 रोजी दिल्लीस अखिल भारतीय खिलाफत कान्फरन्स आयोजित केली. हिंदुनी खिलाफत चळवळीस पाठिंबा दयावा असे आवाहन गांधीजीनी यावेळी हिंदुंना केले. यावेळी मुस्लिम नेत्यांनाही गांधीजींच्या असहकार चळवळीस मदत करण्याचे मान्य केले.

**असहकार आंदोलनाचे स्वरुप**

26 डिसेंबर 1920 रोजी भरलेल्या नागपूर अधिवेशनाला या वेळी 14 हजार पेक्षा अधिक प्रतिनिधी देशांच्या काना कोपऱ्यातून आले होते. या पूर्वीच 1 ऑगस्ट रोजी गांधीजींनी असहकाराची घोषणा केलेली होती. नागपूर अधिवेशनात वरील कार्यक्रम घोषीत होताच काँग्रेस कार्यकत्यांनी देशभरात सभा घेऊन असहकार कार्यक्रमांचे स्वरूप व महत्व सामान्य जनतेला पटवून दिले. 50 लाखांवर स्वयंसेवकांची नोंदणी झाली आणि 1 कोटी रुपयाचा स्वराज्य फंड 1 वर्षाच्या आत जमा झाला.

कायदेमंडळात बहिष्कार टाकतांना 1921 च्या निवडणूकीत अनेकांनी उमेदवारी मागे घेतली. हजारो वद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीत शाळा-महाविद्यालये बंद ठेवून बहिष्कारात भाग घेतला परदेशी मालाच्या होळया होऊ लागल्या. सुत कताई व विणकामाला उत्तेजन देऊन खादीचा वापर होऊ लागला. हिदूस्थानातील राजकीय असंतोष कमी करण्यासाठी 10 नोंव्हेबर 1921 रोजी इंग्लंडच्या युवराजचे मुंबईत आगमन झाले यावेळी त्यांचे स्वागत मिरवणूका, निषेध सभा, हरताळ, बहिष्कार या गोष्टींनी करण्यात आला.

**चौरीचौरा प्रकरण व चळवळीची समाप्ती**

1 फेब्रुवारी 1922 रोजी गांधीजींनी बार्डोली सत्याग्रहाची घोषणा केली. त्या दिशेने तयारी सुरू असताना 5 फेब्रुवारी रोजी गोरखपूर जिल्ह्यातील चौरीचौरा येथे स्वयंसेवकांनी मिरवणूक काढली. शांतपणे जाणाऱ्या या मिरवणूकीवर पोलिसांनी गोळीबार केला. संतापलेल्या जमावाने पोलिसांवर हल्ला केला. त्यामुळे स्वयंसंरक्षणार्थ पोलिसांनी एका इमारतीचा आश्रय घेतला. पण जमावाने इमारतच पेटवून दिली. बाहेर पडणाऱ्या पोलिसांनाही ठेचून मारले. यात 21 पोलिस ठार झाले. या घटनेने म.गांधींना मोठा धक्का बसला. कारण आपल्या आंदोलनात त्यांना हिंसा अपेक्षित नव्हती. बार्डोली सत्याग्रह व असहकार कार्यक्रम स्थगित केल्याची त्यांनी घोषणा केली. अनेक नेत्यांना गांधीजींचा निर्णय आवडला नाही. लोकांमध्येही त्यांची लोकप्रियता वाढली. याचा फायदा घेऊन इंग्रजांनी गांधीजींना 10 मार्च 1922 रोजी राजद्रोहाच्या आरोपाखाली अटक केली. गांधीजींना 6 वर्षे तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

**सविनय कायदेभंग चळवळ**

26 जानेवारी हा दिवस काँग्रेसने संपूर्ण देशभर स्वातंत्र्यदिन म्हणून पाळण्याचे आवाहन केले. 14 फेब्रुवारी 1930 रोजी राष्ट्रसभेने म.गांधीच्या नेतृत्वाखाली सविनय कायदेभंगाचा जनतेला आदेश दिला.

**दांडीयात्रा व कायदेभंग चळवळीला प्रारंभ**

सर्वांनाच गरजेचे असलेल्या मीठावर सरकारने कर लावला होता. म्हणून गांधीजींनी मीठाचा सत्याग्रह करून कायदेभंग चळवळ सुरू केली. "दैनंदिन गरजेच्या साध्य वस्तूंच्या स्वातंत्र्यसंग्रामाशी संबंध जोडणे आम्हाला सोपे वाटत नव्हते. मात्र ही किमया गांधीनी करून दाखविली." 12 मार्च 1930 रोजी गांधीजी 75 अनुयायांसह साबरमती आश्रमातून दांडीयात्रेसाठी निघाले. सुमारे 241 मैलांचे अंतर 24 दिवसांत कापून 5 एप्रिल रोजी गांधीजी दांडी येथे पोहोचले. 6 एप्रिल रोजी गांधीजींना दांडीच्या किनाऱ्यावरील मीठ उचलून कायदेभंगाची घोषणा केली. यामुळे ब्रिटिश सरकारने त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना 5 मे 1930 रोजी अटक केली. सरोजिनी नायडूंच्या नेतृत्वाखाली धरासवा येथे 22 मे रोजी मीठाचा सत्याग्रह करण्यात आला आणि हे आंदोलन यशस्वी झाले.

**'चले जाव' किंवा भारत छोडो आंदोलन**

6 जुलै 1942 रोजी वर्धा या ठिकाणी काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत 'चले जाव ठराव' एकमताने पास झाला. याचबरोबर युद्धकार्यासाठी इंग्लंडला भारत मदत करेल असेही ठरवण्यात आले. 7 ऑगस्ट 1942 रोजी मुंबईला काँग्रेसचे अधिवेशन सुरू झाले. यावेळी नेहरुंनी भारत छोडोचा ठराव मांडला. 8 ऑगस्ट 1942 रोजी वयाच्या 73 वर्षी गांधीजींनी जनतेला मंत्रमुग्ध करणारे भाषण केले. यावेळी जनतेला "ह्या क्षणापासून सर्व भारतीयांनी आपण स्वतंत्र झालो आहोत असे समजावे आणि 'करेंगे या मरेंगे' या निर्धाराने ही चळवळ चालवावी" असा आदेश देऊन चले जावच्या ठरावाला मंजूरी दिली.

"अर्पित सारी भक्ति हमारी उस पवित्र सपने को।
उगा गये तुम बीज, सिंचने का अधिकार हमारा।
आयेगा आकाश हाथ में, सारी रात जगेंगे।"

- म.गांधी

**मूल्यमापन**

महात्मा गांधीजींनी आपले महाविद्यालयीन शिक्षण भारतात घेतले होते. त्यानंतर त्यांनी विलायतेला जाऊन बॅरिस्टर ही पदवी मिळविली. वकिली व्यवसायानिमित्त एका खटल्यासंदर्भत 1893 मध्ये ते दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटिश वसाहत नाताळ येथे गेले असता तेथेच त्यांचा प्रभावी नेता म्हणून उदय झालाल. 1906 ते 1914 या काळात त्यांनी आफ्रिकेतील सरकारला नमवून अनेक कर व कायदे रद्द करून घेतले.

गोपाळकृष्ण गोखले यांच्या आग्रहाने 1915 मध्ये मायदेशी परतले. गोखलेंना राजकीय गुरु मानून त्यांनी राजकारणात प्रवेश केला. आपल्या अहिंसक वृत्तीचा फायदा करून त्यांनी भारतीय चळवळी सुरू करून भारतीय लोकांना त्यांनी अहिंसेच्या मार्गाने आपण सर्वकाही मिळवू शकतो असा दिलासा दिला. आपले सत्याग्रह त्यांनी सुरूच ठेवले आणि ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. त्यांच्या अशा स्वभावाचा काही लोकांना रागही यायचा पण हिंसेने आपल्याच भारतीय जनतेला गमावून बसू, त्यापेक्षा आपण एकीने सर्व अहिंसात्मक मार्गाने ब्रिटिशांना धडा शिकवू या त्यांच्या संममी वृत्तीने 1948 ला भारत स्वतंत्र झाला आणि गांधीजींची लोकप्रियता भारतातच नाही तर देशभरात झाली.

**संदर्भ सूची**

१. आत्मकथा – मोहनदास करमचंद गांधी, अनुवाद-शि.पू. पटवर्धन

२. विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड 1 ते 8 - य.दि. फडके

३. आधुनिक भारताचा इतिहास-सुमन वैद्य, शांता कोठेकर

४. आधुनिक भारताचा इतिहास-प्रा.जितेंद्र सुरेश भामरे